**<u>ठळक बातम्या</u>**

- नक्षलवाद्यांच्या पॉलिट ब्युरोचा महत्त्वाचा सदस्य भूपती उर्फ मल्लोजुला वेणुगोपाल याच्यासह ६१ नक्षली अतिरेक्यांचं गडचिरोली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण

- सरकारने नक्षलवादाविरुद्ध उभारलेला लढा निर्णायक पद्धतीने समाप्तीकडे चालला असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या प्रचाराचा प्रारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज करणार

**आणि**

- राजस्थानमध्ये जैसलमेरजवळ झालेल्या बस अपघातात मृतांची संख्या २०

**<><><><><>**

नक्षलवाद्यांच्या पॉलिट ब्युरोचा महत्त्वाचा सदस्य भूपती उर्फ मल्लोजुला वेणुगोपाल याच्यासह ६१ नक्षली अतिरेक्यांनी आज गडचिरोली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रीतसर आत्मसमर्पण केलं. त्या नंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितलं...

**होल्ड...बाईट - मुख्यमंत्री**

२०१४ पासून राज्यात आपल्या सरकारने नक्षलवादाविरुद्ध उभारलेला लढा आज निर्णायक पद्धतीने समाप्तीकडे चालला आहे. असं सांगून ते म्हणाले, आता फक्त काही मोजके नक्षलवादी बाकी असून तेही लवकरच आत्मसमर्पण करतील कारण त्यांना आता कोणीही नेता उरलेला नाही. मार्च २०२६ देश नक्षलमुक्त करण्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं उद्दिष्ट राज्याने वेळेआधीच पूर्ण केलं आहे, असं ही

मुख्यमंत्री म्हणाले. ऐकूया या विषयी अधिक माहिती आमच्या गडचिरोली वार्ताहराकडून

… **व्हॉईस कास्ट- निमगडे पीटीसी**

**<><><><><>**

छत्तीसगडमधे सुकमा इथं ५० लाखांचं बक्षीस लागलेल्या २७ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यात पीएलजीए बटालियन क्रमांक १ मधे सक्रीय २ कट्टर माओवाद्याचा समावेश असल्याचं सुकमाच्या पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

**<><><><><>**

माजी सैनिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीची रक्कम दुप्पट करण्याच्या निर्णयाला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी मंजुरी दिली आहे. निवृत्तीवेतन न मिळणाऱ्या वयोवृद्ध माजी सैनिकांना किंवा त्यांच्या विनाउत्पन्न विधवांना माजी सैनिक कल्याण विभागातर्फे देण्यात येणारं दरमहा ४ हजार रुपयांचं अनुदान वाढवून आता आठ हजार करण्यात आलं आहे. त्याचप्रमाणे मुलांच्या शिक्षण आणि लग्नासाठी देण्यात येणारं अनुदानही दुप्पट झालं आहे. येत्या १ नोव्हेंबरनंतर केलेल्या अर्जासाठी हा निर्णय लागू असेल, असं संरक्षण मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. सैन्यदल ध्वजनिधीच्या अंतर्गत येणाऱ्या रक्षामंत्री माजी सैनिक कल्याण निधीतून या योजनेचा खर्च केला जातो आणि या निर्णयामुळे सुमारे २५७ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे.

**<><><><><>**

भारतीय रेल्वे दरवर्षी २ लाख ५६ हजार कोटी रुपये आधुनिकीकरणावर खर्च करत असून गेल्या ११ वर्षात ४६ हजार किलोमीटर रेल्वेमार्गाच विद्युतीकरण करण्यात आल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथे आयोजित सोळाव्या आंतरराष्ट्रीय रेल्वे उपकरण प्रदर्शनाचं उद्घाटन करताना ते आज बोलत होते. या प्रदर्शनात १५ देशांमधून साडेचारशेहून अधिक

उद्योजक सहभागी झाले असून उत्तम दर्जाची रेल्वे आणि मेट्रो उत्पादनं त्यांनी या प्रदर्शनात ठेवली आहेत.

या प्रदर्शनामुळे भारतीय उद्योजकांच्या रेल्वे तंत्रज्ञानातल्या उत्पादनांना जागतिक व्यासपीठ मिळेल, असं भारतीय उद्योग महासंघ- सीआयआय चे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

भारतरत्न आणि माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे.

डॉ कलाम हे द्रष्टे वैज्ञानिक, प्रेरणादायी नेते आणि देशभक्त होते. त्यांनी संरक्षण क्षेत्रात, विज्ञानात तसेच युवक सक्षमीकरणासाठी अथक प्रयत्न केले आणि देशाला आत्मनिर्भरतेच्या मार्गावर आणलं, असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

डॉ कलाम यांनी देशातल्या तरुणांना नवी ऊर्जा देत मोठी स्वप्ने पाहण्यास प्रेरित केलं. डॉ कलाम यांच्या स्वप्नातल्या बलशाली, आत्मनिर्भर आणि दयाशील भारताच्या निर्मितीसाठी आम्ही प्रयत्नशील राहू, असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या प्रचाराचा प्रारंभ भाजपचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज करणार आहेत. ‘मेरा बूथ सबसे मजबूत’ मोहिमेअंतर्गत ते बिहारमधे भाजपाच्या बूथ पातळीवरच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.

दरम्यान बिहार विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाने काल ७१ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. एनडीएचा आणखी एक मित्रपक्ष असलेल्या हिंदुस्तानी अवाम मोर्चा सेक्युलर या पक्षानेही ६ उमेदवारांची नावं जाहीर केली.

सीपीआय एम एल लिबरेशनने १८ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. दरम्यान, महाआघाडीच्या घटक पक्षांमध्ये जागावाटपाबाबत बैठकांचं सत्र सुरू आहे, आज हे जागावाटप जाहीर होण्याची शक्यता आहे.

जनता दल युनायटेडनेही ५७ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. अनेक विद्यमान आमदार आणि राज्यमंत्र्यांना जदयूने पुन्हा एकदा संधी दिली आहे. त्यात विजयकुमार चौधरी, श्रवण कुमार, मदन साहनी, सुनील कुमार यांचा समावेश आहे.

बिहारचे उपमुख्यमंत्री विजय सिन्हा यांनी आज लखीसराय मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. बिहारचे दुसरे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता त्यांच्यासमवेत होते.

**<><><><><>**

जम्मूकाश्मीरमधल्या बडगाम, झारखंडमधे घाटशिला, ओदिशात नुआपाडा, आणि तेलंगणात ज्युबिली हिल्स या मतदारसंघांसाठी देखील भाजपाने उमेदवार जाहीर केले आहेत. घाटशिलामधे बाबूलाल सोरेन यांना उमेदवारी मिळाली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आंध्र प्रदेशला भेट देणार आहेत. या दौऱ्यात ते नंद्याल जिल्ह्यातल्या श्रीशैलम इथल्या श्री भ्रमरम्बा मल्लिकार्जुन स्वामी वरला देवस्थानम इथं पूजा करतील. ते श्रीशैलममधील श्री शिवाजी स्फूर्ती केंद्रालाही भेट देणार आहेत. तसंच प्रधानमंत्र्यांच्या हस्ते कुर्नूलमध्ये सुमारे १३ हजार ४३० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात येणार आहे. या दौऱ्यात एका जाहीर  सभेला देखील मोदी संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

राजस्थानमध्ये जैसलमेरजवळ काल एका वातानुकूलित बसला आग लागून झालेल्या अपघातात २० जणांचा मृत्यू झाला तर १५ प्रवासी जखमी झाले. जखमींपैकी अनेकजण ७० टक्क्यांपर्यंत गंभीर भाजले आहेत. शॉर्ट सर्किटमुळे हा अपघात झाला असावा अशी शक्यता वर्तवण्यात आली असून जखमींना उपचारासाठी जोधपूरच्या महात्मा गांधी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र  मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून केंद्र सरकारनं मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**//<><><><><>//**